लोकसत्ता पृ. पान क्र. १

# महामार्गावर महापालिकेतर्फे सीसीटीव्ही कॅमेरे

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहराच्या हद्दीत असलेल्या मुंबई- अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याकडेला मोठ्या प्रमाणात माती आणि कचरा भराव टाकला जात आहे. त्यामुळे यावर रोख आणण्यासाठी महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

मिरा रोड येथील काशीमिरा भागातून मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या मार्गावरील दहिसर टोल नाक्यापासून ते पुढे घोडबंदर पुलापर्यंत मिरा-भाईंदर महापालिकेची हद्द आहे. या महामार्गांच्याकडेला मोठ्या प्रमाणात बाहेरील भराव आणून टाकला जात आहे. यात मातीबरोबर कचरा व डेब्रिजचा समावेश आहे. त्यामुळे येथून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो.

एकीकडे पालिकेचे सफाई कर्मचारी दररोज शहरातील कचरा गोळा करून कचराभूमीवर नेऊन टाकण्याचे काम करतात. मात्र दुसरीकडे महामार्गावर रात्रीच्या सुमारास छुप्या मार्गाने कचरा आणून टाकला जाऊ लागला आहे. यामुळे महामार्गालगत कचऱ्याचे ढिगारे तयार होऊन कचराभूमीचे स्वरूप येऊ लागले आहे. याबाबत महापालिकेकडून सातत्याने महामार्ग प्राधिकरणाकडे तक्रार केली जात आहे. परंतु प्राधिकरण याकडे दुर्लक्ष करत आहे. समस्येवर तोडगा काढण्यासाठी महामार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. रात्री भराव करण्यासाठी येणाऱ्या वाहनांची माहिती मिळवून त्यावर कायदेशीर कारवाई करणे सोयीचे होणार असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्याचे आदेश विभाग प्रमुखांना दिले असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त अनिकेत मनोरकर यांनी दिली आहे.

### शौचालयांना देखील सीसीटीव्हीची सुरक्षा

मिरा- भाईंदर महानगरपालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून शहरात २०१ ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची उभारणी केली आहे. शौचालयाचा वापर करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. मात्र यातील काही शौचालयाचा वापर हा निष्काळजीपणाने करत आहेत.यामुळे शौचालयात अनेक समस्या उभ्या राहत असून दरवाजे तुटण्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे शौचालयाच्या मुख्य आवारात सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

# उमेदवार जाहीर नसतानाही महायुतीचा प्रचार

## वसई, विरार शहरांत विविध ठिकाणी मेळावे

**वसई:** आगामी लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. पालघर जिल्ह्यात महायुतीने अजूनही आपला उमेदवार जाहीर केला नाही. मात्र रविवारी शहरात विविध ठिकाणी मेळावे घेत त्यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. यात महायुतीचे संभाव्य उमेदवार खासदार राजेंद्र गावित यांनी उपस्थिती दर्शवत कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

पालघर लोकसभेची निवडणूक जिंकण्यासाठी विविध राजकीय पक्षांची चढाओढ सुरू झाली आहे. महाविकास आघाडी वगळता अजूनही पालघर जिल्ह्यात महायुती, बहुजन विकास आघाडी व इतर घटक पक्ष यांनी अजूनही आपले उमेदवार जाहीर केले नाहीत.

पालघर जिल्ह्यात महाविकास आघाडीने भारती कामडी यांना उमेदवारी जाहीर करीत शनिवार पासून प्रत्यक्ष प्रचाराची सुरुवात झाली आहे.याशिवाय विविध ठिकाणी गावभेटी व गाव बैठका यांना जोर आल्याचे चित्र दिसून येत आहे.

त्यापाठोपाठ आता महायुतीने जरी अधिकृत रित्या उमेदवाराची घोषणा केली नसली तरी रविवारी भाजपा शिवसेना (शिंदे गट) व इतर मित्र या महायुतीने वसई नवघर, नालासोपारा, विरार, नायगाव ते गिरीज अशा ठिकाणी बूथ प्रमुख व पदाधिकारी यांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी महायुतीचे वरीष्ठ नेते व पदाधिकारी यांनी हजेरी लावली होती. विशेषतः या मेळाव्यात महायुतीचे संभाव्य उमेदवार खासदार राजेंद्र गावित यांनी आपली उपस्थिती दर्शवत कार्यकर्त्यांशी संवाद साधला. महायुतीतर्फे जरी प्रत्यक्ष उमेदवाराची घोषणा झाली नसली या मेळाव्यातून प्रचाराची सुरवात झाली.

### कमळ की धनुष्यबाण?

आगामी पालघर लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीतर्फे खासदार राजेंद्र गावित यांची उमेदवारी जवळपास निश्चित असल्याचे मानले जात आहे. मात्र गावित नेमके कमळ की धनुष्यबाण यापैकी कोणत्या चिन्हावर निवडणूक लढणार याबाबत कार्यकर्त्यांमध्ये अजूनही संभ्रम आहे.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

CamScanner

लोकसत्ता पु. पान क्र. ५



# तलवारीमुळे तीन वर्षांपूर्वीच्या हत्येचा छडा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** रिक्षात सापडलेल्या एका तलवारीमुळे तीन वर्षांपूर्वी झालेली एक हत्या आणि अन्य दोन हत्यांचा कट उघडकीस आला आहे. या सनसनाटी प्रकरणात पेल्हार पोलिसांनी तपास करून तीन आरोपींना अटक केली आहे.

बुधवारी पेल्हार पोलीस नियमित तपासणी करत असताना नालासोपारा पूर्वेच्या धानिवबाग येथे एका रिक्षात दोन तलवारी आढळून आल्या होत्या. पोलिसांनी या प्रकरणी पोखन साव (५०) याच्यासह दोन आरोपींना अटक करून गुन्हा दाखल केला होता. पेल्हार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे साहाय्यक पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोलीस निरीक्षक तुकाराम भोपळे यांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास करत असताना धक्कादायक माहिती मिळाली. आरोपी पोखन साव याने २०२१ मध्ये एकाची हत्या करून महामार्गालगत फेकला होता. मात्र तो मृतदेह कुजलेल्या अवस्थेत पोलिसांना मिळाल्यामुळे विरार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती आणि तपास बंद झाला होता. दरम्यान पोलिसांनी अधिक तपास केला असता आणखी दोन हत्येच्या योजनाही उघडकीस आल्या.

## प्रेमसंबंधातून हत्येची योजना

परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे यांनी सांगितले की, आरोपी पोखन साव याचे नालासोपाऱ्यात राहणाऱ्या गुलशन नावाच्या महिलेशी अनैतिक संबंध होते. या प्रेमसंबंधांत गुलशनचा पती वकील इद्रीसी अडसर ठरत होता. त्यामुळे पोखन याने दीड लाख रुपये देऊन अब्दुल शहा ऊर्फ बद्दा (२३) आणि इम्रान सिद्दीकी (२८) यांच्याबरोबर मिळून इद्रीसी याची हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या बापाणे गावाच्या हद्दीत टाकून दिला होता. इद्रीसीची हत्या केल्यानंतर आपला मार्ग मोकळा असे पोखन याला वाटले होते. परंतु गुलशनचे विक्रम गुप्ता नावाच्या आणखी एका तरुणासोबत संबंध असल्याचे पोखनला समजले. त्यामुळे त्याने विक्रम गुप्ता आणि गुलशनची देखील हत्या करण्याची योजना बनवली होती.

## दोघांचे जीव वाचले

इद्रीसीची हत्या करण्यासाठी आरोपी पोखन याने दोन्ही मारेकऱ्यांना प्रत्येकी ३३ हजार रुपये दिले होते. इद्रीसीची हत्या पचवल्यानंतर लगेच गुलशन आणि विक्रम गुप्ता याची हत्या करायची योजना होती. परंतु दोन्ही मारेकऱ्यांनी आधी पैसे मागितले आणि त्यावरून वाद झाला. या काळात गुलशन गावी निघून गेली त्यामुळे पोखनची योजना बारगळली आणि गुलशन तसेच तिचा प्रियकर विक्रम गुप्ता या दोघांचे जीव वाचले, असे पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी सांगितले. आरोपी पोखन साव हा व्याजाने पेसे देण्याचा धंदा करतो. कामानिमित्त त्याचे गुलशनबरोबर प्रेमसंबंध जुळले होते. तिच्यासाठी त्याने इद्रीसीची हत्या केली पण गुलशन अन्य व्यक्तीबरोबर लग्न करून गावी निघून गेली. आरोपीला १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. यांतर पुढील तपासासाठी विरार पोलिसांकडे हा गुन्हा सुपुर्द केला जाणार आहे.

Scanned with OKEN Scanner
CamScanner
CamScanner

म.टा.पु.पान क्र.१

# स्वागतयात्रांची लगबग

## गुढीपाडव्यानिमित्त वसई, विरार, पालघरमध्ये भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन

**म. टा. वृत्तसेवा, वसई/पालघर**


गुढीपाडव्याचे निमित्त साधून वसई-विरार, पालघरमध्ये ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वागतयात्रा, शोभायात्रा, बाईक रॅली, रिल्स स्पर्धा, ढोल-ताशांचे वादन असे भरगच्च कार्यक्रम होणार असून, पाडव्याचा सण उत्साहाने साजरा करण्यासाठी आणि मराठी संस्कृतीचा गजर करण्यासाठी नागरिक सज्ज झाले आहेत.

पहाटेपासूनच स्वागतयात्रा, शोभायात्रांनी पाडव्याचा उत्साह

- स्वागतयात्रा, बाइक रॅली
- ढोल-ताशा पथकांचे वादन

पाहायला मिळणार आहे. विरारमधील विठ्ठल मंदिरातर्फे दरवर्षी निघणारी शोभायात्रा यंदाही विरार पश्चिमेकडील कलावती आई मंदिराजवळून सायंकाळी ४ वाजता निघणार आहे. ढोल-ताशांच्या गजरात मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन यातून घडेल. तसेच या विठ्ठलनाथ संस्थानातर्फे रिल्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'आमची वसई'तर्फे नववर्षाच्या स्वागतासाठी स्वागतयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ वाजता वसई, पंचवटी नाका येथून सुरू होणारी शोभायात्रा वसई किल्ल्यात समाप्त होणार आहे. तसेच विरार येथील यंग स्टार्स ट्रस्टतर्फे गुढीपाडव्यानिमित्त सायंकाळी ५ वाजता महिलांची बाइक रॅली आयोजित करण्यात आली आहे. यावेळी ढोल-ताशा पथक आणि रथयात्रादेखील होणार आहे.

वसईतील नववर्ष स्वागत यात्रा समितीतर्फे दत्त मंदिर ते पारनाका स्वागत यात्रा काढण्यात येणार आहे. यंदा या स्वागतयात्रेचे ३३ वे वर्ष असून पारंपरिक वेशभूषेत वसईकर यामध्ये सहभागी होतील. रमेदी येथील दत्तमंदिर येथे सकाळी ८.३० वाजता गुढीचे विधिवत पूजन करून गुढी उभारून दत्तमंदिर-रमेदी येथून गुढीची भव्य मिरवणूक व शोभा यात्रा निघेल. यामध्ये लेझिम पथक, रुद्र तांडव ढोलताशा पथकाचे वादन आणि विविध वेशभूषेत नागरिक सहभागी होणार आहेत. तर वसईतील गुढीपाडवा उत्सव समितीतर्फे सकाळी ९ वाजता राम मंदिर झेंडा बाजार येथून स्वागतयात्रेचे आयोजन केले आहे. स्वयंसिद्धी ढोल-ताशा पथकाचे वादन आयोजित केले आहे. यासह वसईतील उमेळमान ग्रामस्थांतर्फे सकाळी ८ वाजता हनुमान मंदिर येथून शोभायात्रा आयोजित केली आहे. या यात्रांमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतील.



### पालघरमध्ये 'सूर पहाटेचे'

गुढीपाडवा शोभायात्रा मंडळ आणि संस्कार भारती पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने नववर्षानिमित्त शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही यात्रा सकाळी सात वाजता पालघर शहरातील लक्ष्मी नारायण मंदिर येथून पालघर रेल्वेस्थानकापर्यंत काढण्यात येईल. पारंपरिक वेशभूषा करून आपल्या बहुरंगी संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक दिनेश तारवी व कल्पेश पाटील यांनी केले आहे. तसेच गुढीपाडव्याच्या निमित्ताने संस्कार भारती यांच्या सौजन्याने 'सूर पहाटेचे' हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पालघर नगरपालिका क्षेत्रातील माहीम रोड येथील लक्ष्मी नारायण मंदिर येथे पहाटे सहा ते साडेसात या वेळेत हा कार्यक्रम होईल. प्रसिद्ध गायिका वैदही मुळीक, सुरज पाटील, रूपक आचार्य यांचे गायन तर दीपा चंपानेरकर यांच्याकडून पोवाडा सादर होईल. पंकज आचार्य यांची तबला साथ देणार असून अंकुश घरत यांचा संवादिनी असणार आहे.

Scanned with OKEN Scanner
CamScanner
CamScanner

सकाळ पु. पान क्र. १

# गोमांस विक्रीप्रकरणी तिघांवर गुन्हा

बोळिंज, ता. ८ (बातमीदार) : विरारमधील एका मटन विक्रीच्या दुकान गोमांस विक्री केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून या दुकानात गोमांस विकले जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

विरार पूर्वेला जीवदानी रस्त्यावरील एका दुकानात मटन विक्रीसोबतच गोमांसाची विक्री होत असल्याचा संशय एका व्यक्तीला आला होता. त्याने शुक्रवारी (ता. ५) पोलिसांत तक्रार केली. पोलिस आणि पालिकेच्या घनकचरा विभाग अधिकाऱ्यांनी तपास केल्यानंतर गोमांसाची विक्री होत असल्याचे आढळून आले. या प्रकरणी साजिद कुरेशी (वय २५), फैजन शेख आणि जितेंद्र यादव (वय ५०) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढारी पान क्र. ६

# ऑनलाईन फसवणुकीची रक्कम तक्रारदाराला परत

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या तरुणाला वस्तुविक्रीचे ऑनलाईन टास्क पूर्ण केल्यास जास्त फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवत ऑनलाईन गुंतवणुक करण्यास भाग पाडून अडीच लाखाची फसवणुक केली होती. उत्तन सागरी पोलीसांनी तपास करून तक्रारदाराला फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून दिली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील उत्तन सागरी पोलीस ठाणे हद्दीमध्ये राहणारे विंडा बोनी ढोलु (२३) हा तरुण पार्टटाईम जॉबसाठी व्हिडीओ सर्च करत होता. त्याला मौरीन नावाचे व्यक्तीने एक लिंक पाठवून त्याद्वारे ऑनलाईन वस्तु खरेदी करून त्यांचे विक्रीचे टास्क पुर्ण केले तर जास्त नफा मिळेल असे प्रलोभन दाखवुन पैसे भरण्यास भाग पाडले. त्यावर काही परतावा न देता त्याची २,४९,१७० रुपये एवढ्या रकमेची फसवणुक करण्यात आली होती. या फसवणुकी बाबत उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयात एकापेक्षा जास्त पिडीत आहेत . या गुन्हयाचा तपास करत असतांना तक्रारदार यांचे पैसे परत मिळवण्यासाठी सदरच्या बँक खात्यामधील रक्कम गोठविण्यात आली होती. त्यानंतर न्यायालयाकडून तक्रारदार यांची रक्कम परत मिळवण्यासाठी पोलीसांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने तक्रारदार बिंडा ढोलु यांची फसवणुक झालेली २,४९,१७० रुपये ही रक्कम त्याला परत मिळवून देण्यात आली आहे.

## किराणा दुकानात मद्यविक्री, दोघांना अटक

**मिरारोड :** भाईंदर पश्चिमेस गणेश देवल नगर झोपडपट्टी येथे असलेल्या किराणा दुकानात दुकानदार किराणा मालासोबत बेकायदा दारू विक्री केली जात होती. पोलिसांनी विदेशी व देशी दारूसाठा जप्त करत दोघांना अटक केली आहे. भाईंदर पश्चिमेच्या गणेश देवल नगर झोपडपट्टी मध्ये दारू विक्री करत असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक रघुनाथ नरोटे यांना मिळाली. त्यानुसार दुकानावर छापा टाकला. त्यावेळी चौधरी हा दोन गिऱ्हाईकांना दारू विक्री करत असल्याचे आढळून आले. पोलीसांनी दोघांना ताब्यात घेत दुकानाची तपासणी केली असता दुकानात देशी आणि विदेशी दारुच्या बाटल्या, बियर मिळून आल्या, पोलिसांनी सर्व दारू जप्त केली असून छोटू चौधरीसह त्याचा साथीदार मोहम्मद सत्तार हनीफ (२४) या दोघांना अटक केली असून दोघांवर भाईंदर पोलीस ठाण्यात दारूबंदी अधिनियमखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner
CamScanner
CamScanner

सकाळ पु. पान क्र. 3

# पालघरचा उमेदवार दोन दिवसांत

## भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची स्पष्टोक्ती; संभ्रम दूर होणार

नालासोपारा, ता. ८ (बातमीदार) : पालघर लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवार कोण हे आमच्यासाठी महत्त्वाचे नाही. देशभरातील ५४२ मतदारसंघांत आमचा उमेदवार एकच आहे आणि त्याचे नाव नरेंद्र मोदी आहे. त्यांच्यासाठी आमचा प्रचारही सुरू झाला आहे, अशा शब्दांत भाजप महाराष्ट्र मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी पालघर लोकसभा उमेदवार निवडीवरील कार्यकर्त्यांमधील संभ्रम दूर केला आहे. तसेच, येत्या दोन दिवसांत उमेदवार निवडीचे चित्र स्पष्ट होईल, असेही त्यांनी सांगितले.

वसई शहर (गिरीज ते नायगाव) मंडळातील महायुती कार्यकर्त्यांचा मेळावा वसई झेंडा बाजार येथील मारोती मंदिराच्या सभागृहात रविवारी (ता. ७) सायंकाळी पार पडला आहे. या मेळाव्यात उपाध्ये यांनी मार्गदर्शन केले. महायुतीसाठी येत्या दोन दिवसांत उमेदवार निवडीचे चित्र स्पष्ट होईल; पण जो कोणी उमेदवार मिळेल, त्याच्यासाठी एकदिलाने-एकमताने काम करू. मोदी यांच्या पाठिशी उभा राहणारा प्रत्येक खासदार हा आमचा उमेदवार आहे. पुढच्या पिढीसाठी, देशाच्या भविष्यासाठी आणि सामाजिक-आर्थिक प्रगतीसाठी मोदींना पुन्हा निवडून आणायचे आहे. आपल्याला केवळ खारीचा वाटा उचलायचा आहे, असे आवाहन उपाध्ये यांनी कार्यकर्त्यांना केले.

मेळाव्यात शिवसेना शिंदे गटाचे खासदार राजेंद्र गावित, भाजप सरचिटणीस राणी द्विवेदी, भाजप जिल्हाप्रमुख महेंद्र पाटील, भाजप वसई विधानसभा प्रमुख मनोज पाटील, जिल्हा उपाध्यक्ष मुकुंद मुळ्ये, शिंदे गट जिल्हाप्रमुख नीलेश तेंडोलकर, जिल्हा सचिव अतुल पाटील, उपजिल्हाप्रमुख दिवाकर सिंग उपस्थित होते.

### मोदींमुळेच देश सुरक्षित!

चारशे वर्षांच्या संघर्षानंतर राममंदिर बांधले गेले. जम्मू-काश्मीरमध्ये लागू केलेले ३७० कलम हटवले गेले. तीन तलाख पद्धती बंद करण्यात यश आले. हे सर्व नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शीपणामुळे हे घडले. काँग्रेसचा आताचा जाहीरनामा पाहा. ३७० हटवण्याची, तीन तलाक बंद करण्याची भाषा त्यात करण्यात आली आहे. या माध्यमातून मुस्लिम माता-भगिनींना पुन्हा अंधारात नेण्याचे काम ते करू पाहत आहे. दहशतवादी कारवाया बंद झाल्याने आपल्याकडे वाकड्या नजरेने कुणी पाहण्याचे धाडस करत नाही. केवळ मोदींमुळेच आज महाराष्ट्र व देश सुरक्षित आहे, असे ठाम मत उपाध्ये यांनी व्यक्त केले.

### महायुतीच्या बॅनरवर बविआचे नाव

1 बविआचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांनी दोन दिवसांपूर्वीच पालघर मतदारसंघात आमचे सहापैकी तीन आमदार आहेत. त्यामुळे आमचा खासदारकीचा हक्क असून कार्यकर्त्यांशी बोलून उमेदवार देणार आहोत, असे स्पष्ट केले होते.

2 पण, महायुतीकडून वसई, विरार, नालासोपारा परिसरात जे प्रचारार्थ मेळावे सुरू आहेत, त्यावर घटक पक्ष म्हणून बविआचे नाव टाकले आहे. त्यामुळे बविआ कार्यकर्त्यांत संभ्रमाचे वातावरण पसरले आहे.

3 यावर केशव उपाध्ये यांना प्रश्न विचारला असता, बविआचा आम्हाला पाठिंबा आहे, असे सांगितले. मात्र, त्यावर हितेंद्र ठाकूर यांनी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. आम्ही उमेदवार देणार आहोत. त्यांना काय टाकायचे ते टाकू द्या. एक दोन दिवसांत भूमिका स्पष्ट होईल.

# ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी गीता जैन शर्यतीत?

## समर्थकांकडून समाजमाध्यमावर 'भावी खासदार' उल्लेख; मिरा-भाईंदरमध्ये चर्चेला उधाण

भाईंदर, ता. ८ (बातमीदार) : ठाणे लोकसभा मतदारसंघ भाजपकडे जाणार की शिंदे गटाकडे, याचा तिढा सुटलेला नाही. दोन्ही बाजूने अनेक संभाव्य उमेदवारांची नावे शर्यतीत आहेत. त्यात आता मिरा-भाईंदरच्या आमदार गीता जैन यांचे नावही समाविष्ट झाले आहे. त्यांच्या समर्थकांनी समाज माध्यमावर भावी खासदार असा उल्लेख केल्याने त्या अचानक चर्चेत आल्या आहेत. जैन यांनी मात्र आपण खासदारकीसाठी इच्छुक नसल्याचे स्पष्ट केले आहे.



भाईंदर : समाजमाध्यमावर आलेल्या पोस्टचा फोटो.

ठाणे लोकसभा मतदारसंघावरून भाजप व शिवसेनेत जोरदार रस्सीखेच सुरू आहे. भाजपकडून माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांचे नाव सर्वांत पुढे आहे, तर शिवसेना शिंदे गटाकडून आमदार प्रताप सरनाईक यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. असे असतानाच मिरा-भाईंदरच्या आमदार गीता जैन यांच्या समर्थकांनी सोमवारी (ता. ८) समाज माध्यमांवर त्यांचा उल्लेख 'भावी खासदार' करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शहरात चांगलीच चर्चा रंगली आहे. जैन यांना उमेदवारी मिळाली, तर त्या भाजपकडून लढणार की धनुष्य बाणावर याचेही अंदाज बांधले जाऊ लागले आहेत.

भाजपमधून २०१९ मध्ये बंडखोरी करून विधानसभेची निवडणूक लढलेल्या गीता जैन अपक्ष म्हणून निवडून आल्या. त्यानंतर त्यांनी लगेच भाजपला पाठिंबा जाहीर केला. मात्र, राज्यात भाजप-शिवसेनेचे सरकार स्थापन होण्याऐवजी मविआ सरकार आले. त्यामुळे त्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला.

अडीच वर्षांनंतर पुन्हा त्यांनी ठाकरे यांची साथ सोडून भाजपसोबत आल्या. आता त्या भाजपसोबतच शिंदे गटाच्या कार्यक्रमांनाही हजेरी लावत आहेत.

### कोणाचा तरी खोडसाळपणा

गीता जैन यांनी मात्र उमेदवारीसाठी इच्छुक असल्याचा स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. कोणीतरी खोडसाळपणे समाज माध्यमांवर आपला उल्लेख भावी खासदार म्हणून केला आहे. आपण ठाणे लोकसभा उमेदवारीच्या शर्यतीत नाही, अशी प्रतिक्रिया गीता जैन यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

CamScanner

लोकमत पू. पान क्र. 4

# हेल्मेटसक्तीकडे वाहनचालकांचे होतेय दुर्लक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** वसईतील खराब रस्त्यांमुळे सध्या दुचाकी अपघातांत वाढ झाली आहे. या अपघातात जखमी किंवा मृत्यू होणाऱ्यांमध्ये हेल्मेट परिधान न करणाऱ्या चालकांची मोठी संख्या आहे. पोलिसांनी याबाबत कडक कारवाई करणे गरजेचे आहे. दोन वर्षांपूर्वी वसई वाहतूक शाखेने हेल्मेटसक्ती केली होती. मात्र, वाहतूक शाखेच्या सूचनेकडे वाहनचालकांनी दुर्लक्ष केले असून हे दुर्लक्ष अनेकदा त्यांच्याच जीवासाठी धोक्याचे ठरताना दिसते.

सध्या महामार्गाचे काँक्रिटीकरण सुरू आहे. तसेच, वसईतील अंतर्गत रस्त्यांचे सुद्धा काँक्रिटीकरण सुरू आहे. त्यामुळे रस्ता मातीचा झाला आहे. तसेच, काही ठिकाणी रस्ता तयार करण्यासाठी बारीक खडी टाकल्याने त्यावर दुचाकीस्वार घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच, वसईतील रस्ते पॅचवर्क मारलेले असल्याने रस्त्याच्या कमी-जास्त उंचीमुळे दुचाकीस्वार घसरून अपघात होत आहेत. त्यातच रस्ते खड्डेमय आहेत.

वसईत हेल्मेटसक्ती कागदावर राहिली आहे. दुचाकीस्वारांना वाहतूक पोलिसांचा धाक राहिला नाही. दुचाकी चालकांना हेल्मेटचे गांभीर्य समजत नसल्याने वाहतूक पोलिसांनी कारवाईची मोहीम गतिशील करण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# नर्सची लाखोंची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तळोजा येथील अरोरा बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या नर्स लुसी फर्नांडिस यांची २०११ ते आजपर्यंत लाखोंची फसवणूक झाली आहे.


आरोपी एजंट धीरज मिश्रा व नीरज मिश्रा यांनी त्यांना सुरुवातीला निळेमोरेच्या शीतलदीप बिल्डिंग येथील फ्लॅट दाखवून त्या बदल्यात ६ लाख रुपये घेतले. त्या बिल्डिंगला एनओसी नाही, असे सांगून फ्लॅट कॅन्सल करून त्यांच्याकडून घेतलेले पैसे परत करण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांना गुणवंत व निखिल वाढेर यांचा तुळींजच्या गोविंदा पार्क येथील फ्लॅट दाखवून १७ लाख रुपयांना व्यवहार नक्की केला. रूम मालक वाढेर यांना १ लाख ७० हजार रुपये देण्यास सांगून फ्लॅटचे रजिस्ट्रेशन केले. फ्लॅट व्यवहारातून घेतलेले ६ लाख ३० हजार रुपये फ्लॅट मालक वाढेर यांना दिले नाहीत. तसेच अद्याप त्यांना फ्लॅटचा ताबा दिला नाही व घेतलेले पैसे परत केले नाही. या व्यवहारात घेतलेले एकूण ८ लाख ६० हजार रुपये घेऊन व्यवहार पूर्ण न करता तसेच घेतलेले पैसे परत न करता त्यांची फसवणूक केली आहे. नालासोपारा पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पान क्र. 8

# माजी आमदार डॉमनिक घोन्सालविस यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**वसई :** समाजवादी विचारांचे वसईचे



माजी आमदार डॉमनिक घोन्साल्विस यांचे रविवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. त्यांच्या मृतदेहावर सोमवारी सांडोर येथील सेंट थॉमस चर्च येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ॲलन, रोहन आणि युरी हे तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

डॉमनिक घोन्साल्विस यांनी आपली राजकीय कारकीर्द जनता पक्षाच्या साथीने सुरू केली. १९७० ते १९७२ मध्ये ते पंचायत समिती सदस्य होते. त्यानंतर १३ वर्षे ते ठाणे जिल्हा परिषदेचे सदस्य होते, तर १९८५ ते १९९० या कालावधीत ते वसई विधानसभेचे आमदार होते.

आमदार म्हणून त्यांनी आपल्या कार्यकाळात कामाचा ठसा उमटविला होता. सांडोर येथील बंगली सोसायटीचे संस्थापक संचालक, बॅसीन कॅथॉलिक बँकेचे संचालक, खरेदी-विक्री संघाचे संस्थापक अध्यक्ष, पान मार्केटिंग सोसायटीचे अध्यक्ष, कार्डिनल ग्रेशस हॉस्पिटलचे विश्वस्त, वसई कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष, साधना भांडारचे संस्थापक, साधना सहकारी पतपेढीचे संस्थापक, म. वि. कुलकर्णी ट्रस्टचे अध्यक्ष अशा विविध पदांवर त्यांनी जबाबदारी पार पाडली. वसई तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांचे आमदार, कार्यकर्त्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

CamScanner

लोकमत पू. पान क्र. ५

# बलात्कार करेन, म्हणत महिलेच्या कपड्यांना हात

## विनयभंग करणाऱ्यास ठोकल्या बेड्या



लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : आरोपीने फिर्यादी महिलेला अश्लील शिवीगाळ करत रस्त्यावर तुझे कपडे काढून बलात्कार करेन, असे धमकावत मारहाण करत बळजबरीने ओढून रस्त्यात नेले. तिचा कमरेजवळील कुर्ता फाडला, अशी फिर्याद दाखल होताच नवघर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. संदेलकुमार उर्फ पालनाथ नाडर (वय ३८) असे या गुंडाचे नाव आहे.

भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट भागात अमिनाबीबी शेख ही महिला खाद्यपदार्थाची गाडी लावते. आरोपी नाडर याने तिच्याकडे दोन हजार रुपये मागितले असता तिने नकार दिल्यानंतर ही घटना घडली होती. आरोपीला ५ एप्रिल रोजी जेरबंद केल्याचे पोलिसांनी सांगितले.

शेख यांच्यासोबत झालेल्या घटनेनंतर प्रहार दिव्यांग क्रांती संस्थाच्या मीरा-भाईंदर महिला अध्यक्ष काजल नाईक यांच्यासह दिव्यांग व महिलांनी संताप व्यक्त करत नाडर याला तत्काळ अटक करण्याची मागणी केली होती. नाडर हा न्यू गोल्डन नेस्ट-इंद्रलोक परिसरात हातगाडी-बाकडे लावणाऱ्यांकडून हप्ता गोळा करतो. हप्ता दिला नाही तर मारहाण, धमकावणे, तोडफोड असे प्रकार करतो. त्याला विचारल्याशिवाय या भागात कोणाला गाडी लावता येत नाही, असा आरोप होत आहे.

### यापूर्वीही मारहाण, फसवणुकीचे गुन्हे

जानेवारीतही नाडर याने क्रीडा संकुलाजवळ चहाचा स्टॉल लावणाऱ्या जिलाजीत यादव व त्यांचा भाचा संदीप याला हप्ता दिला नाही म्हणून मारहाण केली होती. याप्रकरणी नवघर पोलिसांनी २१ जानेवारीला यादव यांच्या फिर्यादीवरून त्याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. विशेष म्हणजे यादव यांच्या फिर्यादीत अमीना शेख हिच्याकडे नाडर हा दोन हजार महिना घेत होता. तिने पैसे नसल्याचे सांगितल्यावरून तिला शिवीगाळ करत होता, हे नमूद होते. परंतु ठोस आणि कठोर कारवाई न झाल्याने त्याने अमीना यांच्यावर हल्ला केल्याचा आरोप करत संताप व्यक्त होत आहे. नाडर याने स्टॉल बांधण्यासाठी ५० हजार रुपये घेऊन दिव्यांग तरुणीला फसवल्याबद्दल मार्च महिन्यातच नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.



विरारच्या कारगिलनगर रिक्षा स्टँड येथे मनपाने लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या वारकरी चौकाची कचराकुंडी झाली आहे.

# स्वच्छ भारत अभियानाची विरारमध्ये ऐशीतैशी

## वारकरी चौक झाला उकीरडा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : स्वच्छ भारत अभियानात भाग घेऊन आपले शहर किती सुंदर आहे, हे दाखविण्याचा प्रयत्न दरवर्षी वसई-विरार महापालिकेकडून केला जात असताना लाखो रुपये खर्चून सुशोभीकरण केलेले चौक कचऱ्याचे उकीरडे बनल्याचे दिसत आहे. अवघ्या एक दिवसावर गुढीपाडवा सण आला असतानाही पालिकेचे स्वच्छता विभागाचे ठेकेदार कर्मचाऱ्यांकडून कचरा उचलत नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

हेमंत गुरव यांनी सांगितले की, विरारच्या कारगिलनगर रिक्षा स्टँड येथे मनपाने लाखो रुपये खर्च करून वारकरी चौक उभारला आहे, परंतु त्याची कचराकुंडी झाली आहे.

- या चौकाच्या परिसरात बाजार भरविला जात असून, पालिका ठेकेदार मात्र रोज फेरीवाल्यांकडून कराची पावती फाडत असतात. मात्र, बाजार संपल्यानंतर तत्काळ कचरा उचलला जात नसल्यामुळे दिवसभर हा कचरा रस्त्यावर पडलेला असतो. त्यामुळे आजूबाजूला कचऱ्याचे साम्राज्य पसरून परिसर बकाल झाला आहे.
- गुढीपाडव्याच्या आधी मराठी संस्कृतीचे दर्शन घडविणारे असे सर्व चौक साफसफाई करण्याचा विसर पालिकेला पडला आहे. पालिकेवर गेल्या चार वर्षापासून प्रशासक म्हणून आयुक्त कारभार पाहात आहेत. मात्र, अशा भोंगळ कारभाराला पालिका अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप हेमंत गुरव यांनी केला आहे.

Scanned with OKEN Scanner
CamScanner
CamScanner

लोकमत पू पान क्र.3



कामगारांसाठी बांधलेल्या झोपड्यांना आग लागून पाच गॅस सिलिंडरचे स्फोट झाल्याने परिसर हादरून गेला होता.

# झोपड्यांना आग; सिलिंडरचे स्फोट

## मीरा रोडमधील घटना : धुराचे पसरले लोट, जीवितहानी नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोड येथील एका विकासकाच्या कामगारांसाठी असलेल्या झोपड्यांना आग लागून पाच गॅस सिलिंडरचे स्फोट झाल्याने परिसर हादरून गेला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

कनकिया भागातील के. डी. एम्पायरमागील सालासर ग्रुपचे इमारत बांधकाम सुरू आहे. तेथे काम करणाऱ्या मजुरांना राहण्यासाठी झोपड्या बनविल्या आहेत. सोमवारी दुपारी त्यातील एका झोपडीस आग लागून ती पसरू लागली. काही वेळातच एकामागोमाग एक असे पाच गॅस सिलिंडरचे स्फोट होऊन परिसर हादरून गेला. धुराचे लोट उसळले.

महापालिकेच्या अग्निशमन दलास याची माहिती मिळताच स्वतः अग्निशमन दलाचे प्रमुख प्रकाश बोराडे यांच्यासह अन्य ३ अधिकारी व ३२ जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. पाच अग्निशमन बंब, दोन टँकरने आग आटोक्यात आणली.

### तीन झोपड्या खाक

गॅस सिलिंडरचे स्फोट होत असल्याने जवानांनी आतील काही सिलिंडर सुरक्षितरीत्या बाहेर काढले. आगीत तीन झोपड्या जळून गेल्या आहेत. परिसरात शाळा-महाविद्यालये आणि निवासी संकुले असल्याने घबराट माजली. दरम्यान, पोलिस उपायुक्त कार्यालयातून परिमंडळ-१ चे उपायुक्त प्रकाश गायकवाड, मीरा रोडचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे आदी घटनास्थळी आले.



वसई-विरार महापालिकेने टोकरे खैरपाडा येथे अनधिकृत व्यापारी गाळे व इतर बांधकामांवर सोमवारी मोठी कारवाई केली.

# अनधिकृत व्यापारी गाळे, बांधकामे जमीनदोस्त

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : वसई-विरार महापालिकेच्या नियोजन प्राधिकरण विभागामार्फत टोकरे खैरपाडा येथे अनधिकृत व्यापारी गाळे व इतर बांधकाम असे मिळून सुमारे २३ हजार फुटाचे बांधकाम सोमवारी जमीनदोस्त करण्यात आले. यामध्ये सहा हजार स्क्वेअर फुटावरील व्यापारी गाळे व १७ हजार स्केअर फुटावरील इतर बांधकामांचा समावेश होता.

टोकरे खैरपाडा या भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे उभी राहिली होती. या बांधकामांबाबत अनेक तक्रारी नियोजन प्राधिकरणाकडे येत होत्या, त्यामुळे ही कारवाई करण्यात आली. सहायक आयुक्त मोहन संख्ये (विशेष नियोजन प्राधिकरण) यांच्या उपस्थितीमध्ये ही कारवाई करण्यात आली. यावेळी वसई विरार महापालिकेचे अभियंते व कर्मचारी मोठ्या प्रमाणावर हजर होते.

# ऑर्केस्ट्राच्या आड बारबालांचा अश्लील नाच!

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : कायद्याने बंदी असूनही ऑर्केस्ट्रा बारच्या आड अश्लील नाच चालवणाऱ्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील नादट सिटी आर्केस्ट्रावर पोलिसांनी धाड टाकून ९ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

नाइट सिटी ऑर्केस्ट्रा बारमध्ये बेकायदेशीरपणे अश्लील हावभाव करत नाच सुरू असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. मीरारोड विभागाचे सहायक पोलिस आयुक्त विजयकुमार मराठे, काशिमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक योगेश काळे व पोलिस पथकाने ६ व ७ एप्रिलच्या मध्यरात्री नाइट सिटी ऑर्केस्ट्रा बारवर धाड टाकली.

या बारमध्ये ऑर्केस्ट्राच्या आड बारबालांना नृत्य करण्यास भाग पाडले जात होते. अश्लील हावभाव करत त्यांना नाचवले जात असल्याचे पोलिसांना आढळून आले. याप्रकरणी ७ एप्रिल रोजी काशिमीरा पोलिसांनी बारचा मालक शेखर महाबळ शेट्टी, चालक चंद्रनाथ जयराम शेट्टी, व्यवस्थापक हरीश शेट्टीसह वेटर देवीप्रशांत शेट्टी, सनी कुमार प्रसाद, अनिल कुमार राम, उमेश शेट्टी, राजेश रवींद्र जाधव आदींवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

CamScanner

लोकमत पू. पान क्र. 1

## वसईतील दुकानात चोरी



नालासोपारा : वसईच्या बाजारपेठेत राहणारे रमेशचंद्र शहा (७८) यांच्या दुकानात ४ एप्रिलला रात्री चोरी झाली आहे. चोरट्याने त्यांच्या दुकानाचे लोखंडी शटर उचकटून दुकानात प्रवेश केला. दुकानात वेगवेगळ्या ठिकाणी ठेवलेले ६१ हजार १०० रुपये, २५ हजारांचे ५० धातूचे शिक्के, २५ हजारांची सोन्याची अंगठी, १ लाख १० हजारांचे २०० किलो वजनाचे तांबे, पितळ धातूचे भंगार असा एकूण २ लाख २१ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. वसई पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास सुरू आहे.

## एटीएम कार्डची अदलाबदली करत फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सातीवली रोड येथील साहनी चाळ येथे राहणारे सुबोध कामत (४३) यांची एटीएम केंद्रात पैसे काढताना फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी शनिवारी वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

२१ मार्चला संध्याकाळी सातीवली नोका येथील एचडीएफसी बँकेच्या एटीएम केंद्रात ते पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी तेथे तीन आरोपींपैकी एकाने एटीएम मशीन हॅक झाली आहे. तेथून पैसे येत नाही. दुसऱ्या मशीनमधून पैसे काढण्यासाठी सांगितले. दुसऱ्या मशीनजवळ दोनपैकी एका आरोपीने त्यांच्या एटीएम कार्डची अदलाबदली करीत दुसऱ्या मशीनमध्ये कार्ड टाकून पिन नंबर टाकायला सांगितले. त्यानंतर त्यांच्या बँक खात्यातून एक लाख रुपये काढून त्यांची फसवणूक केली.

## विनापरवाना वाहतूक; डिझेल टँकर जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मांडवी पोलिसांनी खानिवडे टोल नाक्याजवळ बुधवारी विनापरवाना अवैधरीत्या वाहतूक करणारा डिझेल टँकर पकडला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

आरोपी चालक कौसर शेख हा ३०,९१६ लिटर डिझेल असलेल्या टँकरची वाहतूक करताना आढळला आहे. पोलिस अंमलदार अमोल साळुंखे यांनी बुधवारी पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे, तसेच टँकरसह ४२ लाख ८२ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे वसई-विरार परिसरातील विनापरवाना अवैध वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## अमली पदार्थांचे सेवन महागात

नालासोपारा : अमली पदार्थ पिणाऱ्या ४ जणांना नायगाव पोलिसांनी शनिवारी पकडले आहे. नायगाव पोलिसांनी शनिवारी संध्याकाळी जूचंद्र फाटकाच्या समोरील मोकळ्या जागेत अभिषेक राय (२२), अनुराग चतुर्वेदी (२१), सुरेंद्र महतो (२१) आणि शोन चांदेकर (२३) या चौघांना अमली पदार्थांचे सेवन करताना पकडले आहे. नायगाव पोलिसांनी वेगवेगळे चार गुन्हे दाखल केले आहेत. अधिक तपास सुरू आहे.

लोकमत पान क्र. 2

## नाईकांच्या प्रचारामुळे शिंदेसेनेत चलबिचल

लोकमत न्यूज नेटवर्क



मीरा रोड : ठाणे लोकसभा मतदारसंघातून माजी खासदार संजीव नाईक यांनी आपण पक्षाच्या निर्देशानुसार प्रचाराला सुरुवात केल्याचे तसेच शिंदेसेनेचे निवडणूक चिन्ह देखील असू शकते, असे वक्तव्य केल्याने शिंदेसेनेत चलबिचल झाली आहे. ठाण्याचा लोकसभा मतदारसंघ हा धर्मवीर आनंद दिघे यांचा गड आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसैनिकच उमेदवार म्हणून देतील, अशी खात्री असल्याची भावना शिवसैनिक व्यक्त करत आहेत.

रविवारी रात्री भाईंदरला बालाजीनगरमधून संजीव नाईक यांनी प्रचाराची सुरुवात करत असल्याचे एका बैठकीत सांगितले होते. पक्षाने प्रचार सुरू करण्यास सांगितले असून, आपली उमेदवारी ९९ टक्के निश्चित झाली आहे, असे सांगितले होते. 'लोकमत'ने याबाबतचे वृत्त दिल्यानंतर शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल सुरू झाली आहे. ठाण्याचा उमेदवार शिवसैनिकच असावा. धर्मवीर आनंद दिघे यांचा गड तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाण्याचे असताना भाजपचा उमेदवार आयात करावा लागल्यास ती एकप्रकारे नामुष्की ठरेल, असे शिवसैनिकांचे मत आहे.

Scanned with OKEN Scanner
CamScanner
CamScanner

लोकमत

# तीन वर्षांपूर्वीच्या हत्येचा केला पेल्हार पोलिसांनी उलगडा

## प्रेमसंबंधातून झाली होती हत्या : तीन आरोपींना केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** तिघांनी तीन वर्षांपूर्वी हत्या केलेल्या प्रकरणाचा उलगडा करण्यात पेल्हार पोलिसांना यश आल्याची माहिती सोमवारी पोलिस उपायुक्त जयंत भजबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अनैतिक संबंधातून हत्या केल्याचे उघड झाले. अजून एक हत्या करण्याचा प्लॅन आखल्याची कबुली आरोपींनी दिली.

धानिवबाग तलाव परिसरातून बुधवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान पेल्हार पोलिसांनी आरोपी पोखन साव (५०) आणि अब्दुल शहा ऊर्फ बडा (२३) यांना तलवार, सुरा बाळगल्याप्रकरणी अटक केली होती. पोलिसांनी तलवार, चाकू, मोबाइल आणि रिक्षा जप्त केली आहे. चौकशीत हत्येच्या गुन्ह्याचा उलगडा झाला. ३ सप्टेंबर २०२१ रोजी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील बाफाणे येथे वकील अहमद इद्रीसी (२७) या तरुणाचा मृतदेह आढळला होता. मुख्य आरोपीने पोखन साव, इम्रान सिद्दिकी आणि अब्दुल शाह या तिघांनी मिळून



अनैतिक संबंधातून तीन वर्षांपूर्वी हत्या केल्याची कबुली आरोपींनी दिली असून अजून एक हत्या करण्याचा प्लॅन आखल्याचेही उघड झाले आहे. पकडलेल्या तीन आरोपींसह पेल्हार पोलिस अधिकारी-कर्मचारी.

### दुसऱ्या प्रियकराच्याही हत्येचा आखला कट, पण पूर्ण झाला नाही

- आरोपी पोखन याचे नायगाव येथील एका महिलेसोबत प्रेमसंबंध होते; पण तिचा पती वकील अहमद इदीसी हा अडसर ठरत असल्याने आरोपीने साथीदारांच्या मदतीने कट रचून ३ सप्टेंबर २०२१च्या रात्री महामार्गावरील बाफाणे गावाच्या हद्दीत रिक्षामध्ये बसवून शिवीगाळ, दमदाटी करत इदिसीचा गळा आवळून मानेत दुचाकीची चावी खुपसून हत्या केली होती. त्याचा मृतदेह भालीवली गावच्या हद्दीत एका खड्ड्यात फेकून दिला होता. आरोपीने त्या महिलेचा दुसरा प्रियकर विक्रम गुप्ता याचीही हत्या करण्याचा कट आखला होता; परंतु तो पूर्ण होऊ शकला नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

- ही कामगिरी पोलिस उपायुक्त जयंत भजबळे, सहायक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलिस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, पोलिस निरीक्षक (प्रशासन) शकील शेख, गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि सोपान पाटील, उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, हवालदार योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, रवी वानखेडे, संजय मासाळ, मिथुन मोहिते, किरण आव्हाड, राहुल कर्पे, निखिल मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी केली आहे.



CamScanner

दैनिक दबंग दुनिया

निष्पक्ष नज़र, निष्पक्ष खबर

## पेल्हार पुलिस को बड़ी सफलता

# 3 साल पहले प्रेमिका के रिश्ते में बाधक बने पति की हत्या की गुत्थी सुलझी

नाग लोपेज » वसई

पेल्हार पुलिस स्टेशन की अपराध जांच शाखा ने एक हत्या का पर्दाफाश कर, 3 अभियुक्तों को गिरफ्तार करने में सफल रही है। दरअसल,शाखा की टीम ने 3 साल पहले प्रेमिका के प्रेम प्रसंग में बाधक बने पति की हत्या की गुत्थी सुलझा ली है। यह पूरी कार्रवाई एमबीवीवी पुलिस आयुक्तालय के पुलिस कमिश्नर (मधुकर पांडेय) अतिरिक्त पुलिस आयुक्त (श्रीकांत पाठक), डीसीपी (परिमंडल 3) जयंत बजबले व एसीपी बजरंग देसाई के मार्गदर्शन में पेल्हार थाने के सीनियर पीआई जितेंद्र वनकोटी, पीआई (अपराध) कुमारगौरव धादवड व पीआई (प्रशासन) शकील शेख के नेतृत्व में एपीआई सोपान पाटील व पीएसआई तुकाराम भोपाले की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने सोमवार को दी है।

### धारदार हथियार लेकर आने वाले है

पुलिस अधिकारी ने कहा कि,3 अप्रैल 2023 को, अपराध जांच दस्ते के एपीआई सोपान पाटील को विश्वसनीय सूचना मिली कि दो व्यक्ति अपने पास धारदार हथियार लेकर किसी संज्ञेय अपराध को अंजाम देने के इरादे से धानिवबाग, बजरंग चाल, नालासोपारा पूर्व में आ रहे हैं। जब एपीआई/सोपान पाटिल ने इसकी जानकारी पेल्हार पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी को दी, तो उन्होंने खबर की प्रामाणिकता की जांच करने और कानूनी कार्रवाई करने का आदेश दिया।

### हथियार व ऑटो रिक्शा बरामद

उक्त आदेश के अनुपालन में, एपीआई सोपान पाटिल, पीएसआई तुकाराम भोपाले और अपराध जांच दस्ते की पुलिस टीम ने घटनास्थल पर जाल बिछाया और पोखन परन साव, उम्र 50 वर्ष, अब्दुल मुबारक अली शाह उर्फ बड्डा उम्र 23 वर्ष को हिरासत में लिया। पंचा के समक्ष जब




### हत्या कर शव को गड्ढे में फेंक दिया था

वकील अहमद को 3/9/2021 को रात्रि करीब 20:30 बजे राधा कृष्ण होटल के पास, मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक 8 पर बफाने गांव की सीमा से ऑटो रिक्शा नं.एमएच 47 एक्स 1923 में उसे डालकर गाली-गलौज करते हुए उसका गला दबा दिया, उसके गले में डियो दुपहिया वाहन की चाबी डालकर उसकी हत्या कर दी और उसके शव को मौजे भालीवली गांव की सीमा में मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय राजमार्ग संख्या 8 के गुजरात चैनल के पास गड्ढे में फेंक दिया। पुलिस जांच में यह खुलासा हुआ। जब आरोपियों ने यह स्थान दिखाया जहां मृतक को जबरदस्ती रिक्शा में बैठाया गया था और वह स्थान जहां शव फेंका गया था, तो पेल्हार पुलिस स्टेशन की अपराध पहचान टीम ने जितेंद्र वनकोटी को सूचित किया।उन्होंने मामले की गहन जांच के आदेश दिये।

ऑटो रिक्शा, एक तलवार, एक चाकू, धारदार हथियार और एक मोबाइल फोन मिला जिसे जब्त कर लिया गया। इस संबंध में उपरोक्त अभियुक्तों के खिलाफ पेल्हार थाने में भारतीय शस्त्र अधिनियम की धारा 4, 25 के साथ सह एम.पी.अधिनियम की धारा 37 (1), (3) 135 के तहत अपराध दर्ज किया गया।

### प्रेम - प्रसंग में बाधा बन रहा था

पुलिस अधिकारी ने कहा कि वरिष्ठ पुलिस निरीक्षक जीतेंद्र वनकोटी ने अपराध

अपराध की जांच करने का आदेश दिया था। उक्त अपराध की जांच के दौरान एपीआई/सोपान पाटील को अपने गुप्त मुखबिर से जानकारी मिली कि उपरोक्त अपराध में गिरफ्तार अभियुक्तों ने 3 वर्ष पहले एक व्यक्ति की हत्या कर दी थी। तदनुसार, एपीआई सोपान पाटील, पीएसआई/तुकाराम भोपाले और पुलिस टीम ने गिरफ्तार अभियुक्तों पर विशेषज्ञ जांच की। गिरफ्तार आरोपी पोखन परन साव उम्र 50 वर्ष का नायगांव में रहने वाली एक महिला से प्रेम-प्रसंग चल रहा था। चूंकि महिला का पति वकील अहमद बादशाह अहमद इद्रीसी

गिरफ्तार अभियुक्त पोखन साव ने अपने साथी अब्दुल मुबारक अली शाह उर्फ बड्डा और इमरान इब्राहिम सिद्दीकी के साथ मिलकर साजिश रची।

### रची थी एक ओर हत्या की साजिश

तदनुसार, उस स्थान के बारे में जानकारी लेने पर जहां वकील अहमद को फेंका गया था, विरार पुलिस स्टेशन में 6/9/2021 को एक अज्ञात शख्स का शव क्षत-विक्षत अवस्था में पाया गया था। इस संबंध में विरार थाने में सीआरपीसी कलम 174 के तहत अपराध दर्ज किया गया था। साथ ही उक्त वकील अहमद के लापता होने के संबंध में वालिव पुलिस स्टेशन में गुमशुदगी दर्ज करायी गयी है। जब उक्त अभियुक्त पोखन साव से गहन पूछताछ की गई तो उसने उक्त महिला के दूसरे प्रेमी विक्रम गुप्ता की भी हत्या की साजिश रची थी, लेकिन जांच में पता चला है कि यह पूरा नहीं हो सका। इस संबंध में विरार पुलिस स्टेशन में धारा 302, 364, 201, 504, 506, 34 के तहत मामला दर्ज किया गया है। उक्त अपराध में तीनों अभियुक्तों को पेल्हार

CamScanner